**प्रकल्प प्रवर्तक भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांचा प्रस्तावित भारतमाला परियोजना (लॉट ५/ पॅकेज २) अंतर्गत महाराष्ट्र राज्यातील सोलापूर जिल्ह्यातील अक्कलकोट तालुक्यातील अक्कलकोट-केएन/टीएस सीमा विभागातील ४/६ लेन ग्रीनफिल्ड अलाईनमेंटच्या अक्कलकोट ते मैदर्गी - दुधनी ते कर्नाटका राज्य सीमाहद्दीपर्यंत २६ कि.मी. रस्ता उभारणी संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी बाबतचा इतिवृतांत**

प्रकल्प प्रवर्तक भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांचा प्रस्तावित भारतमाला परियोजना (लॉट ५/पॅकेज २) अंतर्गत महाराष्ट्र राज्यातील सोलापूर जिल्ह्यातील अक्कलकोट तालुक्यातील अक्कलकोट-केएन/टीएस सीमा विभागातील ४/६ लेन ग्रीनफिल्ड अलाईनमेंटच्या अक्कलकोट ते मैदर्गी - दुधनी ते कर्नाटका राज्य सीमाहद्दीपर्यंत २६ कि.मी. रस्ता उभारणी संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी गुरुवार, दिनांक, २८ जुलै, २०२२ रोजी सकाळी ११.३० वाजता नियोजन भवन, सात रस्ता, सोलापूर येथे आयोजित करण्यात आलेली होती.

जिल्हाधिकारी, सोलापूर यांनी पर्यावरणविषयक जनसुनावणी घेण्यास गुरुवार, दिनांक, २८ जुलै, २०२२ रोजी सकाळी ११.३० वाजता मान्यता दिल्यानंतर सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाच्या अधिसुचना दिनांक १४-०९-२००६, सुधारित अधिसुचना दिनांक ०१-१२-२००९ अनुसार आणि २२-०८-२०१३ नुसार त्यांच्या कार्यालयीन आदेश क्रं. ई-५० /२०२२ ,व्दारा पत्र क्रं.बीओ/जेडी/डब्लुपीसी/पीएच/बी २२०७०४-एफटीएस-००३३ दिनांक -०४ जुलै, २०२२ अन्वये खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती गठित केलीः-

१) जिल्हादंडाधिकारी, सोलापूर - **अध्यक्ष**
किंवा त्यांचे प्रतिनिधी
(अपर जिल्हादंडाधिकारी यांच्यापेक्षा
कमी दर्जाचा नसावा)

**२)** प्रादेशिक अधिकारी, - **सदस्य**
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे
(महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांचे प्रतिनिधी)

३) उप प्रादेशिक अधिकारी, - **समन्वयक**
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सोलापूर

श्री. अजित वसंतराव पाटील, उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सोलापूर तथा सदस्य, समन्वयक - आयोजक, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सौ. शमा पवार, अपर जिल्हादंडाधिकारी, सोलापूर तथा अध्यक्षा, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती, शासकीय अधिकारी व कर्मचारी, प्रकल्प प्रवर्तकांचे प्रतिनिधी, पत्रकार, पर्यावरण क्षेत्रात कार्यरत असणा-या संस्था व उपस्थित असलेल्या स्थानिक जनतेचे स्वागत केले. समितीच्या अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी बाबतची प्रस्तावना विषद केली. तदनंतर श्री. अजित पाटील यांनी सांगितले की, दुसऱ्या एका महत्वाच्या कार्यालयीन कामात व्यस्त असल्याने प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, पुणे आजच्या कार्यक्रमाला उपस्थित राहू शकणार नाही, असे दुरध्वनीद्वारे कळविले होते.

आयोजक यांनी असे सांगितले की भारत सरकारच्या पर्यावरण, वने आणि जल वायू परिवर्तन मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर, २००६ व सुधारित दिनांक १ डिसेंबर, २००९ आणि २२ ऑगस्ट, २०१३ च्या अधिसूचनेनुसार विशिष्ट प्रकल्पांना पर्यावरणविषयक अनुमती घेणे बंधनकारक असून त्यापुर्वी पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी आयोजित करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे. श्री पाटील,, सदस्य, आयोजक यांनी असे सांगितले की महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास प्रकल्प प्रवर्तक भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांचा प्रस्तावित भारतमाला परियोजना (लॉट ५/पॅकेज २) अंतर्गत महाराष्ट्र राज्यातील सोलापूर जिल्हयातील अक्कलकोट तालुक्यातील अक्कलकोट-केएन/टीएस सीमा विभागातील ४/६ लेन ग्रीनफिल्ड अलाईनमेंटच्या अक्कलकोट ते मैदर्गी - दुधनी ते कर्नाटका राज्य सीमाहद्दीपर्यंत २६ कि.मी. रस्ता उभारणी संदर्भात संदर्भात पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी आयोजित करण्यासाठी अर्ज प्राप्त झाला.

सदरहू प्रकल्प हा पर्यावरण अधिसूचना २००६ (सुधारित) अन्वये संवर्ग अ मध्ये मोडत आहे.

सदस्य, आयोजक यांनी असे स्पष्टीकरण दिले की पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणीचा मूळ उद्देश प्रकल्प परिसरातील सामान्य जनतेस प्रकल्पाविषयी व प्रकल्पामुळे होणारे परिणाम व त्याबाबत सामान्य जनतेच्या भावना जाणून घेणे, प्रकल्पात

बंधनकारक असणा-या प्रदूषण नियंत्रण संयत्रणेची माहिती सामान्य जनतेस देणे व त्यांनी दिलेल्या सूचनेचा विचार करणे आहे. प्रकल्प प्रवर्तकांनी भारत सरकारच्या पर्यावरण, वने आणि जल वायू परिवर्तन विभागास पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार करण्याची परवानगी मागितली व सदरहू विभागाने दिनांक १५-०१-२०२१ रोजी त्यास मान्यता देण्यात आली.

वरिल पर्यावरण अधिसुचनेनुसार एक महिना अगोदर स्थानिक वृत्तपत्रात पर्यावरण विषयक जाहीर लोकसूनावणी सूचना देणे बंधनकारक आहे. त्याअनुषंगाने उप प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सोलापूर यांनी स्थानिक वृत्तपत्र सकाळ यात मराठीत व राष्ट्रीय वृत्तपत्र इंडियन एक्सप्रेस यात इंग्रजीत दिनांक २४ जून, २०२२ रोजी जाहिर जनसुनावणी सूचना प्रकाशित केलेली होती. त्यात सामान्य जनतेस उपरोक्त प्रकल्पाविषयी काही पर्यावरणीय आक्षेप, हरकती, सूचना असल्यास त्या लेखी स्वरुपात नोंदविण्याचे आवाहन करण्यात आले होते.

त्याचप्रमाणे नियोजित प्रकल्पाविषयीचा पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल व कार्यकारी सारांश अहवाल यांच्या मराठीतील प्रति सर्व जनतेच्या अवलोकनार्थ शासनाच्या खालील अधिसूचित कार्यालयात उपलब्ध करण्यात आलेल्या होत्याः-

1) मा. जिल्हाधिकारी कार्यालय - सोलापूर
2) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद - सोलापूर
3) महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र - सोलापूर
4) पर्यावरण आणि वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र शासन, नवीन प्रशासकीय इमारत, १५वा मजला, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
5) सहसंचालक (जल प्रदूषण नियंत्रण), महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्पतरू पॉईंट, ३रा माळा, पीव्हीआर सिनेमागृहासमोर, सायन सर्कलजवळ, सायन पूर्व, मुंबई - ४०० ०२२
6) प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, जोग सेंटर, ३रा मजला, वाकडेवाडी, जुना पुणे-मुंबई रस्ता, पुणे - ४११ ००३
7) उप प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, ब/४, बाळी बिल्डिंग, सिव्हिल लाईन्स, शासकीय दूध डेअरीसमोर, सात रस्ता, सोलापूर
8) तहसीलदार, तहसील कार्यालय-अक्कलकोट, तालुका- अक्कलकोट, जिल्हा - सोलापूर

9) गटविकास अधिकारी, पंचायत समिती- अक्कलकोट, पंचायत समिती - मैंदर्गी, पंचायत समिती - दुधनी, जिल्हा - सोलापूर

10) मुख्याधिकारी, अक्कलकोट नगरपरिषद, मुख्याधिकारी, मैदर्गी नगरपरिषद, मुख्याधिकारी, दुधनी नगरपरिषद, जिल्हा - सोलापूर

11) ग्रामसेवक / सरपंच, ग्रामपंचायत, कार्यालये - मौजे अक्कलकोट, इटगे, उपरगे, मिरजगी, नागोरे, संगोली, बसवंत, मुगळी, तालुका-अकक्लकोट, जिल्हा-सोलापूर

12) मप्रनि मंडळाचे संकतस्थळ

सदस्य, आयोजक यांनी उपस्थित असलेल्या सर्वांना त्यांचे प्रस्तावित प्रकल्पाविषयी काही पर्यावरणीय आक्षेप, हरकती, सूचना असल्यास त्या उपस्थित करण्याची संधि देण्यात आलेली असून ते लेखी वा तोंडी स्वरुपात सादरीकरणानंतर देऊ शकतात असे सांगितले. श्री पाटील यांनी पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी सुरु करण्याची विनंती मा. अध्यक्षांना केली.

मा. अध्यक्षा यांच्या परवानगीने पर्यावरणल सल्लागार यांनी प्रकल्पाची संपूर्ण माहिती देताना सांगितले की सदरहू प्रकल्पामुळे अक्कलकोट (ग्रामीण), इटगे, उमरजे, मिरजगी, मैंदर्गी, नागोरे, सांगोगी (बसवन), मुगली, दुधनी हा गावे बाधित होणार आहे. त्यांनी बांधकाम करताना होणारे परिणाम, पावसाचे पाण्याचा, पुराच्या पाण्याचा निचरा होण्यासाठी रस्त्याच्या दोन्ही बाजूस पुरविण्यात आलेले ड्रेन्स, प्रकल्प विकसित करताना होणा-या घन कच-याचे नियोजन, रस्ता विकसित करतानाच विविध ठिकाणी हरितपट्टयाचे नियोजन, संपूर्ण पर्यावरण व्यवस्थापन योजनेची माहिती दिली. सादरीकरणानंतर आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना त्यांचे आक्षेप, सूचना, टीकाटिप्पणी असल्यास त्या उपस्थित करण्याचे आवाहन केले. प्रश्नकर्त्यांने आपले संपूर्ण नांव व पता सांगण्याची सूचना केली.

**उपस्थित नागरिकांनी विचारलेले प्रश्न व त्यास प्रकल्प प्रवर्तक / प्रकल्प सल्लागार / पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांना दिलेली उत्तरे याबाबतची माहिती पुढीलप्रमाणे आहे-**

१) **<u>श्री सोमलिंग बंडाप्पा निंबाळ, राहणार-मिरजगी, तालुका-अक्कलकोट, जिल्हा-सोलापूरः-</u>**

माझी गट नं. १५२/२, मौजे मिरजगी, तालुका-अक्कलकोट, जिल्हा-सोलापूर येथे आठ एकर शेतीचे क्षेत्र आहे. त्याच्यामधूनच हा प्रस्तावित रस्ता जाणार आहे. माझे खाली घर व शेती प्रस्तावित महामार्गातुन जाणार आहे. मी २०१६-१७ ला पस्तीस लाखाचे कर्ज काढून गाळमाती टाकून केळीची बाग तयार केली. त्यातून तीन एकर क्षेत्र गेले. केळी बाग गेली, त्याचा मोबदला जास्त मिळावा. कारण मी कर्ज काढून शेती पिकविलेली आहे.

२) **<u>श्री महानतेश्वर शिवण्णा सोलापुरे, राहणार-मिरजगी -काशीबाई भिमशा निंबाळ यांच्यातर्फे, गट नं.६६, मौजे मिरजगी, तालुका-अक्कलकोट, जिल्हा-सोलापूरः-</u>**

काशीबाई भिमशा निंबाळ यांची गट नं.६६, मौजे मिरजगी येथे ६ एकर जमिन आहे. सदया शेतात ऊस लावलेला आहे. प्रस्तावित रस्ता हा शेतातून जातो, शिवाय राहते घरही ह्या रस्ता प्रकल्पात जाणार आहे. तरी त्याप्रमाणे घराचा व शेतीचा मोबदला मिळावा.

त्यांनी पुढे सांगितले की हा जो ग्रीन कॉरिडर एक्सप्रेस वे आहे, त्यामुळे लोकांची सोय होईल, गावासाठी फायद्याचा होईल. मात्र शेतक-यांना व प्रकल्पग्रस्तांना योग्य मोबदला मिळावा. आमचा प्रकल्पाला विरोध नाही, पण आमच्यावर अन्याय होऊ नये.

३) **<u>श्री सैफन इब्राहिम मुल्ला, राहणार-गट नं.१४८ पैकी २, गाव-मिरजगी, तालुका - अक्कलकोट, जिल्हा - सोलापूरः-</u>**

माझी गट नं. 148/2 येथे चार एकर शेती असून प्रस्तावित रस्ता हा माझ्या शेतीच्या मधून गेलेला आहे. शेतात ऊसाचे पीक लावले होते. तो आताच काढला. खालून वर जायला रस्ता नाही. पाण्याची पाईपलाईन ही रस्त्यामधून जात आहे. विहिर आणि विहिरीचे पाणीसुध्दा रस्त्यामध्ये गेलेले आहे. शेतात गोबर गॅससुध्दा आहे. त्याप्रमाणे मोबदला त्याप्रमाणे मिळावा.

४) **<u>श्री धोंडप्पा बसवंत निंबाळे, राहणार-मिरजगी,तालुका-अक्कलकोट, जिल्हा-सोलापूरः-</u>**
माझी गट नं.६६ येथे दोन एकर शेती आहे. शेतीत उडीद डाळीचे पीक काढण्यात येते. तरी नुकसानभरपाई देण्यात यावी.

५) **<u>श्री विठोबा सीताराम निंबाळे, राहणार-मिरजगी,तालुका-अकक्लकोट, जिल्हा-सोलापूरः-</u>**

माझी शेती गट नं. ६६/२/ब/३ येथे पाच एकर शेती आहे. घर आहे. तेथे आता ऊसाचे पीक असून लिंबाचे व नारळाचे झाडे आहे.

सदस्य, आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी यांनी जनसुनावणी बैठकीत उपस्थित केलेल्या सर्व सूचनांचा परामर्श घेतला. येथे मत मांडले की बैठकीतील चर्चेत असे दिसून येते की कोणाचाच विकासाला, प्रकल्पास विरोध नाही. मात्र जे प्रकल्प बाधित आहेत, त्यांना योग्यप्रकारे मोबदला मिळावा. त्यांनी प्रकल्प प्रवर्तकांना बैठकीत उपस्थित करण्यात आलेल्या सूचनांबाबत स्पष्टीकरण देण्याची सूचना केली.

प्रकल्प प्रवर्तक यांनी बैठकीत करण्यात आलेल्या सादरीकरणानंतर उपस्थित गावक-यांनी त्यांच्या सूचना उपस्थित केल्या. येथे असे दिसून आले की कोणाचाही प्रस्तावित प्रकल्पास/रस्त्यास विरोध नाही. त्याचे म्हणणे आहे की जी काही जमिन, पाईपलाईन, विहिरी, गोबर गॅस, घर, झाडे, नारळाची, लिंबाची झाडे यांचा योग्य तो मोबदला मिळावा. यासाठी सरकारने विशेष भूसंपादन अधिकारी नियुक्त केलेला आहे, आणि निश्चितच कायद्याप्रमाणे मोबदला दिला जाईल.

जनसुनावणीस श्री विनोद ठाकूर, अक्कलकोट, श्री निलेश गायकवाड,सोलापूर, श्री शाम धहवे, सोलापूर, श्री तुषार धनवे, सोलापूर हे ग्रामस्थ उपस्थित होते. त्यांनी जनसुनावणी दरम्यान सूचना/टीकाटिप्पणी/आक्षेप नोंदविले नाहीत.

बैठकीत उपस्थितांनी स्वाक्षरी केलेली यादी सोबत जोडली आहे. लेखी सूचना, आक्षेप इ. प्राप्त झालेले नाहीत.

अध्यक्षा, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की सर्वांनाच कळले आहे की प्रस्तावित रस्ता हा कोठून जाणार आहे. सरकारने विशेष भूसंपादन अधिकारी नियुक्त केलेला आहे, आणि निश्चितच कायद्याप्रमाणे मोबदला दिला जाईल.

अध्यक्षा व सदस्य, आयोजक यांनी उपस्थितांना आणखी काही सूचना, आक्षेप असल्यास त्या नोंदविण्याचे आवाहन केले. उपस्थितांकडून कोणताही प्रतिसाद नव्हता. त्यांनी आयोजक यांना बैठकीचा समारोप करण्याची सूचना केली.

सदस्य, आयोजक यांनी सांगितले की उपस्थितांनी केलेल्या सूचनांची नोंद घेण्यात आली असून त्यांचा बैठकीच्या इतिवृतात समावेश करण्यात येईल व ते अंतिम पर्यावरण

आघात मुल्यांकन अहवालासोबत म.प्र.नि.मंडळ-मुख्यालयामार्फत पर्यावरण,वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांना सादर करण्यात येईल. तेथील तज्ज्ञ समिती याबाबत योग्य तो निर्णय घेईल. त्यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानून मा. अध्यक्षा, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांच्यावतीने बैठक संपन्न झायाचे घोषित केले.

मा. अध्यक्षा यांचे आभार मानून जनसुनावणी ही संस्थगित करण्यात आली.

**(अजित पाटील)**
समन्वयक,
पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती
तथा उप प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सोलापूर

**(शमा पवार)**
अध्यक्षा,
पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती
तथा अपर जिल्हादंडाधिकारी, सोलापूर,
जिल्हा - सोलापूर